The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत तुकारामांचे निवडक अभंगाचा एक अभ्यास

**संघई मोनिका महावीर**
**संशोधक विद्यार्थी, श्री शिवाजी महाविद्याल, परभणी**

**प्रस्तावना :**

संत तुकाराम महाराज यांचा जन्म 21 जानेवारी 1608 रोजी माघ शुद्ध पंचमीला महाराष्ट्र राज्यातील देहू या गावी झाला. तुकारामांना वारकरी जगद्गुरु म्हणून ओळखतात. वारकरी संप्रदायाची अखंड परंपरा त्यांनी निर्माण केली. 17 व्या शतकामध्ये सामाजिक सुधारक संत म्हणून तुकाराम महाराजांचा उल्लेख केला जातो. तुकाराम महाराज संत श्रेष्ठ कवी आणि समाजसुधारक होते. अभंग म्हटले की फक्त तुकारामांचे नाव डोळ्यासमोर येते. 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपले तोचि साधू ओळखावा देव तेथेच जाणावा' अशा प्रकारचे अभंग संत तुकाराम महाराजांनी सामान्यांना सांगून ईश्वर भक्तीचा मार्ग दाखविला. वरील अभंग हे रंजले गांजले म्हणजे कुठल्या ना कुठल्या विकाराने आजाराने पीडीत, कष्टी आहेत अशा लोक म्हटले जाते. रंजल्या गांजल्यांना साधुसंत आपलेसे करून घेतात त्यांना मायेचा आसरा देतात योग्य तो सल्ला देतात समानतेची वागणूक देतात तोच खरा साधू आणि देव असतो.

अंधश्रद्धेला विरोध व शूद्रदेवता यावरील टीका आधुनिक काळात समाजाची अवस्था दैन्य स्वरूपाची झाली होती. संत तुकाराम महाराजांनी अंधश्रद्धेला प्रकटपणे विरोध केला होता.

"ऐसे कैसे झाले भोंदू कर्म करुनी म्हणती साधू, अंगाला लावून या राख डोळे झाकून करती पाप"
लोकांची बुद्धी भ्रष्ट झाली होती. शुद्र दैवतांना भजत होते, समाजाची फसवणूक चालू होती, धर्माच्या नावाखाली समाजाला लुटले जात होते. चमत्कार, कर्मकांड, नवस, अंगारा, धुपारा, जादूटोणा याचा प्रसार अत्यंत मोठा प्रमाणात झाला होता. ढोंगी गुरूंची संख्या खूपच वाढली होती. गंजलेल्या समाजाला रस्ता दाखवूने खूप गरजेचे आहे असे तुकारामांना वाटले. स्वतःच्या कर्मावर विश्वास कमी व भोंदू बाबावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांवर प्रकटपणे विरोध केला आहे यामुळे तुकाराम महाराज कधी समाजाचे आई तर कधी वडील झाले अशी दुहेरी भूमिका बजावताना आपल्याला दिसून येतात.

" भगेव तरी श्वास सहज वेष त्याचा येथे
अनुभवाचा काय पंथ वाठवुनी जटा फिरे दाही
दिशा तरी जबुवेषा सहज स्थिती"

समाजामध्ये ढोंगी लोकांची संख्या खूपच जास्त होती. काही लोक स्वतःला देव मानत. त्यांना वाटत असे की, भगवे वस्त्र नेसणे म्हणजेच देव. काही जण जटा वाढवून फिरतात. कुत्र्याचा वेशही भगवाच असतो. या लोकांना देवाचा अनुभव मुळीच नसतो. अज्ञान, गरीब, भोळ्या लोकांना फसवण्याचे काम हे करत असतात. मुळात या ढोगींना काही ज्ञान नसते. स्वतःचा वेगळा पोशाख करून समाजाला

लुटण्याची काम करतात. या ढोंगीपणावर, खोटेपणावर कीर्तन प्रवचन करणाऱ्या वर त्यांनी टीका केली आहे. मुळात त्यांना माहीती नसते पण समाजापुढे सोंग करतात.

" एका बोटाची निशाणी परिपाक नाही
मनी तरी ते बोटांची सोंग कारण वाचूनिया व्यंग
वैष्णवांचा धर्म जग विष्णु नेणे वर्म "

कपाळावर बोटाने गंधाची निशाणी लावून खूप मोठी ज्ञानी आहेत असे स्वतःला समजतात. त्यांची मन अनुभवाच्या बाबतीत अपरिपक्व असते. गंध लावणे हे त्यांचा देखावा असतो हे लोक सोंगाडे आहेत. फक्त सोंग करण्याचे कार्य करतात सर्व रहस्य त्यांना माहिती नसते यामुळे हातातून खूप मोठे पाप घडते हेच ढोंगी समाजाचे शत्रू असतात.

**शिक्षणावरील महत्त्व :**

"आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने
शब्दाचीच शस्त्रे यत्न करू
शब्दची आमुच्या जीवाचे जीवन
शब्द वाटू धन जनलोका
तुका म्हणे पहा शब्दची हा देव
शब्दाची गौरव पूजा करू"

सोप्या आणि सरळ भाषेत सांगायचे झाले तर शब्दही खूप महत्त्वाचे असतात. शब्दाला अन्य साधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहेत. शब्दच माणसाला जोडतात आणि शब्दच माणसाला तोडतात त्याचे उदाहरण हे चुकीच्या पद्धतीने झाले तर त्याचा अर्थ हा वेगळा निघतो. त्यामुळे संत तुकारामांनी शब्दाचे महत्व सांगितले आहे की, आमच्याकडे धन काय असेल तर शब्दाचे रत्न हेच आमचे धन आहे पण समाजातील अपप्रवृत्ती विरोधात लढण्याची गरज निर्माण होते तेव्हा याच शब्दांना शस्त्रे म्हणून वापरतो. आमच्या जीवनाचा अविभाज्य भाग हे शब्दच आहेत. तुकाराम महाराज म्हणतात खरंतर आमच्यासाठी शब्द हेच देव असून या देवाची पूजा ही आम्ही शब्दानेच करतो. आपणही आपल्या जीवनात शब्दाचा उपयोग कधी धन म्हणून तर वेळप्रसंगी शस्त्र म्हणून वापर करावा. आजही अभंग समाजाला खूप महत्त्वाचे वाटतात.

"ओले मूळ वेद खडकाचे अंग
अभ्यासासी सागर कार्यसिद्धी
नव्हे ऐसे काही नाही अवघड
नाही कईवाडा तोच वरी"

एखादे कार्य परंतु ते शिक्षणाने सिद्ध होते त्याचप्रमाणे म्हणतात जसे पेरले तसे उगवते त्याचप्रमाणे अभ्यासाचे देखील आहे एखाद्या झाडाची मूळ ज्याप्रमाणे अंग भेदते त्याप्रमाणे जर आपण चांगल्या प्रकारे अभ्यास केला तर त्याच्या जीवावर कोणतेही कार्य सिद्धी नेता येते येथे काहीही अवघड नाही फक्त जोपर्यंत आपण त्याविषयी अभ्यास करत नाही तोपर्यंत अवघड वाटते दगड जर कितीही मोठा

असला तर दोरीच्या वर्षाने त्याला चीर पडते आपण थोडे थोडे हळूहळू विष खाल्ले तर ते पचन पडते त्याचप्रमाणे जर रोज रोज थोडा अभ्यास केला तर सोपे जाते.

**वैज्ञानिक दृष्टिकोन :**

"नवसे कन्या पुत्र होते तर का करणे लागे पती"

आधुनिक युगात मात्र विज्ञानावर विश्वास ठेवावा त्यामुळे खरे आज पण संतांची विचार लक्षात घ्यावे लागतात कारण संत तुकाराम म्हणतात की, ढोंगी बाबांवर जर विश्वास ठेवला असता तर नवस करून मुल होते तर मग लग्न न करताच पुत्र प्राप्त झाले असते. मूळ बाळ होत नसेल तर उपवास नवस करतात परंतु आजच्या काळात अनेक सोयी सुविधा उपलब्ध आहेत. परंतु त्याचा विचार करत नाहीत. त्यामुळे संत तुकाराम म्हणतात की, जर नवसाला देव पावतो उपवास केल्यावर देव पावतो तर बिना लग्न करून देखील मूल होतात तर का करण्याची गरज नाही ही सर्व अंधश्रद्धा आहे त्यामुळे आज पण संतांच्या विचारांची आवश्यकता आहे.

**प्रपंचकांना उपदेश :**

संसारिक लोकांना महत्व पूर्ण असे काही उपदेश दिले आहेत. चालीरीती व अज्ञानावर हल्ला केला आहे. आपले शरीर नाशवंत आहे. आत्मज्ञानाकडे डोळेझाक करून तु देह बुद्धीत अज्ञानाने झोप घेत आहेस तरी सावध हो आणि स्वतःच्या आयुष्याचे रक्षण कर असा आध्यात्मिक उपदेश संत तुकाराम महाराज यांनी केला आहे.

"जोडूनिया धन उत्तम व्यवहारे उदास विचारे वेच करी
उत्तम ची गती तो एक पावेल उत्तम भोगीला जीवखाणी"

चोख व्यवहाराने पैसे मिळावे उदास वृत्तीने खर्च करा दुसऱ्यावर उपकार करावेत दुसऱ्याची निंदा करू नये पर स्त्रिया आई बहिणी प्रमाणे मानाव्यात प्राणीमात्रांविषयी दया बाळगावी वृत्ती शांत ठेवावी कुणाशी वाईट वागू नये मत्सर करू नये.

**आत्मचरित्रपर अभंग :**

संत तुकारामांची आत्मचरित्र यांची उलगड त्यांचे अभंगातून केलेली दिसून येतात. घराविषयी कुटुंबाविषयी दुष्काळात संकट घरातील व्यक्तींचा झालेला मृत्यू यामुळे आलेले अनुभव सांगितलेले आहेत. महाजनिकी करून व्यापारात मग्न असणारे व सावकारी करणारे तुकारामांच्या संसारातले सुख संपले दुष्काळ पडला होता यामध्ये सर्व गेले होते तेव्हा तुकारामाला असे वाटले की, संसारातील काही सुख राहिले नाही त्यामुळे त्यांनी संसाराकडे पाठ फिरवली आहे असे दिसून येते.

"बरे झाले देवा निघाले दिवाळे
बरी या दुष्काळे पीडा केली
अनुतापे तुझे राहिले चिंतन
जाला हा वमन संसार"

दुष्काळ चालू असतानाच दिवाळी निघाले ते बरे झाले संसार ओकारी वाटू लागला. पत्नी कर्कश असल्याने समाजात दुर्दशा झाली अपमान झाला धन गेले गुरे ढोरे मेली ह्या सर्व गोष्टी झाल्या असे तुकारामांना वाटू लागते कारण त्यांची मन संसारात राहिले नव्हते. तुकारामांनी घर सोडले संसार त्यांना वमन वाटला त्यांचे मन ही विठ्ठल भक्ती रमत होते. शेवटी ते देवाला म्हणतात की बायका मुलांना सोडून देऊन तुझ्यापाशी शरण आलो.

**समारोप :**

संत तुकाराम यांच्या अभंगाचा अभ्यास थोडक्यात विविध मुद्द्यांच्या आधारे विवेचन केला आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1) डॉ. प्रा.जे.बी शिंदे : तुकाराम गाथा.
2) रा .ग जाधव : आनंदाचा डोह
3) नासिराबादकर ल.रा. : प्राचीन मराठी वांगमयाचा इतिहास .